**ठळक बातम्या**

- राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणानं प्रारंभ /अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या दोन्ही सभागृहात सादर

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता येत्या ७ तारखेला जमा होणार

- राज्यात गुन्हेगारी, बेरोजगारी असे अनेक प्रश्न असून सरकार केवळ घोषणाबाजीच करत असल्याची काँग्रेसची टीका

- विधान परिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

**आणि**

- येत्या दोन दिवसात रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये उष्णतेची लाट

**<><><><><>**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने आजपासून मुंबईत प्रारंभ झाला. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी अभिभाषणात केलं. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला.

देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनात राज्याचं १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान असून थेट परकीय गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पहिली पसंती आहे, असं ते म्हणाले. दावोसमध्ये झालेल्या १५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या सामंजस्य कराराचा उल्लेख करुन ते म्हणाले की यातून १५ लाख रोजगारनिर्मिती शक्य आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ५ हजार कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्याची राज्य सरकारची योजना आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल राज्यपालांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले. राज्य सरकार या अंतर्गत उत्कृष्टता केंद्र आणि अनुवाद प्रबोधिनी स्थापन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न सोडवण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्य सरकारनं अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ६ हजार ४८६ कोटी २० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आज दोन्ही सभागृहात सादर केल्या. विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या मागण्या मांडल्या. त्यात सर्वाधिक ३ हजार कोटी रुपयांहून अधिक मागण्या ग्रामविकास विभागाच्या आहे. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पावणे ४ हजार कोटी आणि मुख्यमंत्री बळीराजा वीज दर सवलत योजनेसाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. या मागण्यांवर ६ आणि ७ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरचा आभार प्रस्ताव दोन्ही सभागृहात मांडण्यात आला.

माजी प्रधानमंत्री दिवंगत डॉ मनमोहन सिंग तसंच प्रदीप जाधव नाईक, मुकुंदराव मानकर, उपेंद्र शेंडे, तुकाराम बिरकड दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहून विधानसभेचं कामकाज तहकूब झालं.

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयानं २ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. याप्रकरणी सरकारनं भूमिका मांडावी, अशी मागणी विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. याप्रकरणी न्यायालयाचा निर्णय आल्यावर राज्यपाल किंवा विधानसभा निर्णय घेईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. त्यानंतर विधानपरिषदेत माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांना, तसंच घनश्याम दुबे, नारायण वैद्य, सुभाष चव्हाण या दिवंगत सदस्यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मंजूर झाल्यावर विधान परिषदेचं कामकाजही उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ७ मार्च रोजी सर्व लाभार्थ्यांना दिला जाईल. मार्च महिन्याचा हप्ता अर्थ खात्यातून निधी मिळाल्यानंतर देऊ, अशी माहिती महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधान भवन परिसरात दिली. २ कोटी ४० लाखांपेक्षा अधिक महिला या योजनेच्या लाभार्थी असल्याचं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट तटकरे (१९ सेकंद)**

**<><><><>**

राज्यात गुन्हेगारी, बेरोजगारी असे अनेक प्रश्न असून सरकार केवळ घोषणाबाजीच करत आहे, अशी टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज

विधानभवनाच्या परिसरात वार्ताहरांशी बोलताना केली. राज्यपालांच्या आजच्या अभिभाषणात एकही नवा मुद्दा नव्हता, असं पटोले म्हणाले. राज्यात महिला सुरक्षित नाहीत, उद्योगधंदे राज्याबाहेर चालले आहेत, शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत असून ग्रामीण भाग ओसाड पडत आहे, अशी टीका त्यांनी केली.

**होल्ड बाईट....(१६ सेकंद)**

**<><><><><>**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव, तसंच शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम, नापिकी आणि अतिवृष्टीची भरपाई, तुषार आणि ठीबक सिंचनाचं अनुदान मिळावं, इत्यादी मागण्यांसाठी वाशीममधे आज काँग्रेसचे आमदार अमित झनक यांच्या नेतृत्वात धरणं आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात काँग्रेसचे राज्य सरचिटणीस दिलीप सरनाईक यांच्यासह शेकडो काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं आज यवतमाळ मधे आंदोलन करण्यात आलं. कर्जमाफी, सोयाबीनला हमीभाव इत्यादी मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको आंदोलन केलं. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीनं कर्जमाफी आणि सोयाबीनला सात हजार हमीभाव देण्याचं आश्वासन दिलं होतं, मात्र सत्ता मिळाल्यावर त्याची पूर्तता केली नाही, असा आरोप आंदोलकांनी केला.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं विधान परिषदेच्या ५ जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं त्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होते आहे. विधानसभा आमदारांच्या मधून ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी १० मार्चला अधिसूचना जाहीर होईल. अर्ज दाखल करण्यासाठी १७ मार्चपर्यंत मुदत आहे. १८ मार्चला अर्जांची छाननी झाल्यावर २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटल्यास २७ मार्च रोजी मतदान होईल आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

**<><><><><>**

वन्यजीवन व्यवस्थापनासाठी पारंपरिक ज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिक वापर करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधे जुनागढ जिल्ह्यात सासण – गीर इथं राष्ट्रीय वन्यजीवन मंडळाची सातवी बैठक प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज झाली. त्यावेळी ते बोलत होते. डॉल्फिन संवर्धना विषयी स्थानिक रहिवाशांमधे जागृती निर्माण करावी, असं मोदी यांनी सांगितलं. देशातल्या सिंहगणनेची १६वी फेरी यंदा घेण्यात येईल, असं सांगत त्यांनी बार्डा अभयारण्यात सिंहांच्या जतनासाठी मदत जाहीर केली.

**<><><><><>**

व्हेवज शिखर परिषदेत चित्रपट निर्मितीविषयी मास्टरक्लासचं आयोजन करण्यात आलं आहे. ॲनिमेशन फिल्म मेकर्स कॉम्पिटेशन स्पर्धेच्या विजेत्यांना यात मार्गदर्शनाचा लाभ घेता येईल. यात उद्या गुनीत

मोंगा यांचं, ५ मार्च रोजी अर्नी ओले लोपेज, ६ मार्च रोजी अनुसिंह चौधरी हे मार्गदर्शन करतील. मास्टरक्लासमधे शोबू यार्ला गड्डा यांनी आज मार्गदर्शन केलं. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या वेव्ज या कार्यक्रमाचा हा उपक्रम १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><>**

वेव्ज समिट २०२५ अंतर्गत संगीत क्षेत्रासाठी बॅटल ऑफ बँड्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रसार भारती आणि सारेगामा यांनी संयुक्तरित्या या स्पर्धेचं आयोजन केलं असून त्यात विविध बँड्सना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात ८ वे अभ्यागत पुरस्कार प्रदान केले. देशातल्या अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये जागतिक स्तरावर एक ब्रँड म्हणून उदयाला येण्याची क्षमता असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. देशात संशोधनाला अधिक प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. उच्च शिक्षण संस्थांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात प्रयत्न करण्याचं आवाहन केलं आहे..

**<><><><>**

आयसीसी चॅम्पियन करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताची लढत आता ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. उपांत्य फेरीचा हा पहिला सामना उद्या दुपारी अडीच वाजता दुबई इथं  रंगणार आहे. उपांत्य फेरीचा दुसरा सामना ५ मार्चला न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन संघांदरम्यान लाहोर इथं

होणार आहे. उपांत्य फेरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या सामन्यात विजयी ठरणारे संघ ९ मार्चला होणाऱ्या अंतिम सामन्यात झुंजणार आहेत.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात कोकण, विदर्भ, आणि महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इथं ३८ अंश ६ शतांश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//